**सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात राज्य मराठी विकास संस्थेस अनुदान (योजनेतर) उपलब्ध करुन देण्याबाबत (जून-जुलै, २०१२).**

# महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-अर्थसं-१०१२/प्र.क्र.५३/२०१२/भाषा-३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : १३ ऑगस्ट, २०१२.**

पहा :- १) वित्त विभाग, परिपत्रक क्र.बीजीटी-२०१२/प्र.क्र.५५/अर्थसंकल्प-३, दिनांक ३१ मार्च, २०१२.
२) या विभागाचा शासन निर्णय समक्रमांक दिनांक १० मे, २०१२.
३) वित्त विभाग, परिपत्रक क्र.अंदाज-२०.१२/प्र.क्र.६४/२०१२/अर्थसंकल्प-३, दिनांक ०६ जुलै, २०१२.

**शासन निर्णय :-**

वरील संदर्भाधीन अनुक्रमांक २ येथील शासन परिपत्रकानुसार, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई या शासन अनुदानित संस्थेस, **माहे जून व जुलै, २०१२** या दोन महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी **मागणी क्र.झेडएफ - ०२, मुख्य लेखाशीर्ष - २२०५ - कला व संस्कृती - (०१) (०४) - राज्य मराठी विकास संस्था (योजनेतर) (२२०५ ३१६१) या खाली ३१ वेतनेतर सहायक अनुदाने याकरिता रु.०.५५ लक्ष (रुपये पंचावन्न हजार फक्त) व ३६ वेतनासाठी सहायक अनुदाने याकरिता रु.१३.०० लक्ष (रुपये तेरा लक्ष फक्त) याप्रमाणे एकूण रु.१३.५५ लक्ष (रुपये तेरा लक्ष पंचावन्न हजार फक्त)** इतके अनुदान मंजूर करण्यात येत आहे. सदर संस्थेस सन २०१२-१३ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

## वि व र ण प त्र

**मागणी क्र.झेडएफ - ०२, मुख्य लेखाशीर्ष - २२०५ - कला व संस्कृती (योजनेतर)**

(रु.लक्ष)

| अ. क्र. | उद्दिष्ट | सन २०१२-१३ करिता मंजूर अनुदान | वितरीत अनुदान (मे २०१२ पर्यंत) | वितरीत अनुदान (जून व जुलै २०१२) | एकूण (४ + ५) | शिल्लक अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २) | १) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) | ३.०० | १.०० | ०.५५ | १.५५ | १.४५ |
| | २) ३६ सहायक अनुदान (वेतन) | ७०.११ | १३.०० | १३.०० | २६.०० | ४४.११ |
| | **योजनेतर एकूण (१+२)** | **७३.११** | **१४.००** | **१३.५५** | **२७.५५** | **४५.५६** |

कृ.मा.प.

२. राज्य मराठी विकास संस्थेस सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी मंजूर केलेले अर्थसंकल्पीय अनुदान आहरित व संवितरित करण्यासाठी श्रीमती अंजली वि. अंभिरे, अवर सचिव (आस्थापना), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ व श्रीमती ललिता शि. देठे, उप सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ यांना अनुक्रमे आहरण व संवितरण अधिकारी व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी वरील रकमेचा धनादेश "राज्य मराठी विकास संस्था, मुंबई" या नावाने काढावा.

३. संस्थेस अनुदान वितरित करण्यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: मविसं-१०९३/११/प्र.क्र.१६/९४/५, दिनांक ८.०२.१९९६ अन्वये मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली असून या शासन निर्णयातील प्रत्येक तत्वाचे संस्थेने काटेकोरपणे पालन करावे व शासनास प्रमाणपत्र सादर करावे.

४. या आदेशाव्दारे वितरित करण्यात आलेल्या रकमेतून मासिक निधी विवरणपत्रानुसार (कॅशफ्लो नुसार) खर्च करावा. तसेच केलेल्या खर्चाचा तपशिल व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) राज्य मराठी विकास संस्थेने शासनास सादर करावे.

५. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ चा भाग - पहिला, उपविभाग एक मधील अनुक्रमांक - २७, नियम क्रमांक - १४९ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.बीजीटी-२०.१२/प्र.क्र.५५/अर्थसंकल्प-३, दिनांक ३१ मार्च, २०१२ व परिपत्रक क्र.अंदाज-२०.१२/प्र.क्र.६४/२०१२/अर्थसंकल्प-३, दिनांक ६ जुलै, २०१२ अन्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार व अधिकाराच्या मर्यादेत तसेच वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्रमांक-५००/१२/ व्यय-४, दिनांक ३ ऑगस्ट, २०१२ अन्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार व अधिकाराच्या मर्यादेत निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संगणक संकेतांक क्र.२०१२१२१०१६५०५२६६३३)

**( ललिता शि. देठे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र, मुंबई,
३) महालेखापाल (लेखा परीक्षा) - १ महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई,
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६) सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशान भवन, मुंबई,
७) उप सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) अवर सचिव, वित्त विभाग (व्यय-४ / अर्थसंकल्प-१४ ), मंत्रालय, मुंबई,
१०) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
११) कार्यासन अधिकारी, आस्थापना - ३, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) कार्यासन अधिकारी, आस्थापना - २, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई (३ प्रती),
१३) **निवडनस्ती.**